# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०१/०८/१७
## दि.३१/०७/१७ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | एमआयडीसी पो स्टे २१२/१७,भादविक ३९९,४०२,महा.पो.का.क.३७(१)(१)१३५,आर्म ४(२५) |
| **फिर्यादी** | संजय भागवत,पो.कॉ.एमआयडीसी पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | १.अमोल अशोक गायकवाड,वय-२० २.नितीन शरद पवार,वय-२५ ३.अतिश ऊर्फ पप्पु कोंडी-राम काळे,वय-२४ ४.विनोद प्रकाश बाबर,वय-२१,सर्व रा.बालाजीनगर भोसरी,पुणे (अटक) ५. दादया ऊर्फ कृष्णा गणेश भोसले |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३०/०७/१७ रोजी ०३/२५ वा.उषा एंटरप्राईजेस कंपनी समोर टी.ब्लॉक एमआयडीसी भोसरी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी आप-आपसात संगनमत करून,मा.सह पोलीस आयुक्त,पुणे शहर यांचे पुणे पोलीस आयुक्तालयाचे क्षेत्रात शस्त्रे,सोटे,तलवारी,शारिरीक इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तु जवळ बाळगण्यास बंदी आदेश असताना,त्यांनी सदर प्रतिबंधात्मक आदेशाचा भंग करून,आपले कब्जात बेकायदेशीररित्या व अनधिकृतपणे कोयता, चाकु व मिरची पुड इत्यादी घातक शस्त्रे बेकायदेशीररित्या आपले जवळ बाळगुन,हत्याराची व साथीदारांची जमवाजमव करून,दरोडा टकाण्याची पुर्ण तयारी करून,सदर भागात दहशत निर्माण करून,स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी दरोडा टाकण्याचे तयारीत असताना अ.क्र.१ त ४ हे मिळुन आले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. आहेर ९९२३१२७४५७ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे २९७/१७,भादविक १४१,१४३,१४४,१४८,१४९,३२६,५०४,५०६,आर्म ॲक्ट ४(२५) |
| **फिर्यादी** | नितीन सांगळे,वय-३० वर्षे,रा.रामनगर,वारजे,पुणे |
| **आरोपी** | १.विकास दत्तात्रय शिरसाठ,वय-२३,रा.रामनगर वारजे,पुणे २.आकाश विजय काळेकर,वय-२२,रा.देशमुखवाडी,शिवणे,पुणे ३.विकी विजय काळेकर,वय-२४,रा. रामनगर गोसावी वस्ती, वारजे,पुणे (अटक) ४.सुनिल गुंजाळ ५.काळया येणपुरे,रा. सर्व रामनगर वारजे,पुणे ६.दादया काळेकार ७.गणेश वांजळे ८.पांडुरंग वांजळे |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३०/०७/२०१७ रांजी २०/३० वा.फिर्यादी यांच्या सलुनच्या दुकाना समोर रामनगर वारजे,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व नमुद इसमांची पुर्वीची भांडणे असुन,फिर्यादी यांनी त्यांचेवर खोटी केस केली आहे असे म्हणुन याकारणावरुन चिडुन जावुन,फिर्यादी यांचे दुकानावर कोयता मारुन काच फोडुन,फिर्यादी यांना दुकानातुन बाहेर ओढुन त्यांना कोयत्याने डोक्यात व कानावर वार केले. त्यानंतर फिर्यादी हे पळुन जात असताना त्यांच्या पाठीत दगड मारून लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. निकम ९८२३२०७७४६ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे २९८/१७,भादविक १४१,१४३,१४७,१४८,१४९,५०४ |
| **फिर्यादी** | विवेक मांडेकर,वय-५२ वर्षे,रा.कर्वेनगर,पुणे |
| **आरोपी** | विठठल पारगे व इतर १० ते १२ इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३०/०७/२०१७ रांजी १३/०० ते १४/०० वा. चे दरम्यान चंद्रभागा निवास स.न. ७/१६ गल्लर नं.५,कॅनल रोड,कर्वेनगर,पुणे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे शेतातील शेत मजुरांची पत्र्याचे पाडलेली घरे पाहण्यासाठी फिर्यादी हे गेले असता,यातील नमुद इसमांनी लावलेला बोर्ड फिर्यादी यांनी पाहिला तेव्हा त्यांनी त्यांना माझे जागेत तुम्ही काय करता असे म्हणून त्यांना विरोध केला म्हणुन त्यांनी फि यांना शिवीगाळ करुन हाताने मारहान करण्यास सुरुवात केली त्यामुळे फि यांनी तेथुन पळण्यास सुरुवात केली असता तेथील १०-१२ आ यांनी फि ला पाठिमागुन दगड व विट फेकुन मारली. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. जगताप ९५२७६९०९०९ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शिवाजीनगर पो स्टे २७१/१७,भादविक ४२०,३४ |
| **फिर्यादी** | सिता माकर,वय-६६ वर्ष,रा.सुतारवाडी रोड,पाषाण,पुणे |
| **आरोपी** | दोन अनोळखी महिला |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/०७/२०१७ रोजी सकाळी १०/०० वा.पुणे मनपा बस स्टॉप लोहगाव बस स्टॉप जवळ शिवाजीनगर,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना नमुद अनोळखी महिलांनी त्याचेकडे असलेले गाठोडे उघडुन सोन्याचे मणी दाखवुन,तुमच्याकडील सोन्याच्या बदल्यात मी जास्त सोन्याचे मनी देते असे म्हणुन फिर्यादीस बोलण्यात गुंतवुन त्यांचा विश्वास संपादन करून त्यांचेकडील सोन्याचे दागिने घेवुन ते दागिने छोटया गाठोडयात बांधलेले असुन ते तुमचे तुम्ही घेवुन जा असे फिर्यादी यांना सांगितले नंतर,फिर्यादी यांना अनोळखी दोन महिलांनी दिलेले छोटे गाठोडे उघडुन पाहिले असता त्यामध्ये वाळुचे खडे असल्याचे दिसुन आले. तरी सदर दोन अनोळखी महिलांनी फिर्यादी यांना दागिन्याचे बहाण्याने वाळुचे खडे देवुन,फिर्यादी यांचेकडील सोन्याचे मणी मंगळसुत्र व कानवेल असा एकुण ६५,०००/- रुपये किचे दागिन्याची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. डी एस शिंदे ८१४९३६४१४१ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ३७६/१७,भादविक ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | नरेश कांबळे,वय-२९ वर्षे,रा.कात्रज,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईल धारक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि २६/०५/१६ रोजी ते १४/०६/१७ वा. दरम्यान स.नं.६८/१/११, बी, साईबाबा मंदीराजवळ, बाईसाहेब बंगल्याचे पाठीमागे, आगम मंदिर, कात्रज,पुणे ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना त्यांचे मोबाईलवर एका अज्ञात मोबाईल धारकाने फोन करुन त्यांना मी बॅकेतुन बोलत असुन,तुमचे क्रेडिट कार्डचे पिन ॲक्टीवेशन करावयाचे आहे असे सांगुन,फिर्यादी यांचेकडुन क्रेडिट कार्डवरील १६ अंकी नंबर व सीव्हीव्ही नंबर घेवुन,फिर्यादी यांचे क्रेडिट कार्डवरुन ४३,८८६/- रुपये ऑनलाईन ट्रान्सझेक्शन करुन फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) राजकुमार वाघचवरे ९८२३९९३२९९ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हिंजवडी पो स्टे ३७१/१७,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | स्निग्धा श्रीवास्तव,वय-२४,रा.सिंगरोली,मध्य प्रदेश |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईल धारक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३१/०७/१७ रोजी १३/५० ते १४/२० वा.चे दरम्यान हिंजवडी फेज-२,पुणे याठिकाणी ऑनलाईन माध्यमाव्दारे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना त्यांचे मोबाईलवर एका अज्ञात मोबाईल धारकाने फोन करुन त्यांना मी बॅकेतुन बोलत असुन तुमचे डेबीट कार्ड ब्लॉक झाले आहे. तुमचे ब्लॉक झालेल्या क्रेडीट कार्डचे रिवॉर्ड पॉईट हे फिर्यादी यांना तुमचे बँकेचे खात्यावर ट्रान्सफर करून देतो असे सांगुन त्यांचा विश्वास संपादन करून, फिर्यादी यांचेकडुन डेबीट कार्डची माहिती घेवुन व ओटीपी नंबर घेवुन,फिर्यादी यांचे डेबीट क्रेडिट कार्डवरुन पेटीएमचे खात्यावर १६,५१०/- रुपये ऑनलाईन ट्रान्सझेक्शन करुन फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एन एस न्यामने ९९२३४५७१११ |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ७६३/१७,भादविक ३५३,३३२ |
| **फिर्यादी** | सचिन कुबडे,वय-३६ वर्षे,रा.गंगानगर हडपसर,पुणे |
| **आरोपी** | संतोष इंगुलकर,रा.ससाणेनगर,हडपसर,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३१/०७/१७ रोजी दुपारी १२/०० वा.गल्ली नं.२,पोस्ट ऑफिस समोर हडपसर पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे एमएसईबी मध्ये नोकरीस असुन,यातील नमुद इसम संतोष इंगुलकर यांचे चार महिन्यांचे लाईट बील थकलेले असल्याने फिर्यादीं यांनी त्याचा लाईट मिटर काढला असल्याचा राग मनात धरुन,त्याने फिर्यादीं यांना पकडुन हाताने मारहाण करुन,फिर्यादीं हे करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा आणला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. आदलिंग ९५२७०४०१०१ |

८

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे २९६/१७,भादविक ४२९ व पाळीव प्राण्यांना क्रुरतेने वागण्यापासुन प्रति.का. ११(१)(एच),वन्यजीव संरक्षण कायदा २(१६),५१ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-४७,रा.पुणे |
| **आरोपी** | एक महिला,वय-२६,रा.गंगा किंगस्टन फ्लॅट नं.अे/२०३,मंहमदवाडी,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/०७/१७ ते दि.३०/०७/१७ रोजी फ्लॅट नं.अे/२०३ मंहमदवाडी पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया समाजसेविका असुन,यातील नमुद महिला हिने तीचेकडे असलेल्या पाळीव प्राण्यांचे व्यवस्थीतपणे देखभाल करणे गरजेचे असताना,त्यांचे राहते फ्लॅट मध्ये पाळीव दोन परशीयन मांजरे व एक सेंन्ट बर्नाड जातीचे श्वानास अरुंद जागेत गळ्याला चैन बांधुन ठेवुन,त्यांना दि.२७/०७/१७ रोजी ते दि.३०/०७/१७ रोजीचे दरम्यान अन्न पाण्यावाचुन तळमळत ठेवुन त्यांना यातना होतील असे कृत्य केले. तसेच त्यांचे घरामध्ये कासव पाळण्यास परवाना नसताना मिळुन आली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. ए एम सोनवणे ९१४५४५३००३ |

## <u>दि.०१/०८/१७ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रांतवाडी पो स्टे २९२/१७,भादविक ३९३,३४,आर्म ॲक्ट ४(२५) |
| **फिर्यादी** | संपत पाटील,वय-४५,रा.आळंदी रोड,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३१/०७/१७ रोजी २३/०५ वा. पवार पेट्रोल पंप आळंदी रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे सहकारी सैफल मोहमद नदाफ याचेसह पवार पेट्रोल पंप,आळंदी रोड,पुणे येथे कामास आहेत. फिर्यादी व सैफल हे त्यांचे काम संपवुन पेट्रोल पंपावरील स्टोअर रूममध्ये झोपत असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून तोंडावर रूमाल बांधुन पेट्रोल पंपावर येवुन पेट्रोल आहे असे विचारून,त्यानंतर पैसे कुठे आहेत अशी दमदाटी करून फिर्यादी व सैफल यांना बनावट पिस्तुलाचा धाक दाखवुन जबरी चोरी करण्याचा प्रयत्न करून ऑफीस मध्ये त्यांना पैसे न मिळाल्यामुळे त्यांनी फिर्यादी व सैफल यांना त्यांना धक्का-बुक्की व मारहाण करून,पोलीसांत सांगितले तर जीवे मारण्याची धमकी देवुन निघुन गेले. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी. के एस ताकवले ९८२३३०१०३० |

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोरेगांव पार्क पो स्टे १४२/१७,भादविक २७९,३३८,३०४(अ),४२७,मोव्हे.१३४(अ)(ब), ११९/१७७ |
| **फिर्यादी** | सुर्यकांत नाईक,कोरेगांव पार्क पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | लोकेश रमाकांत पवार,वय-२६,रा.तुकाईनगर वडगांव-बुद्रुक,सिंहगड रोड,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३०/०७/१७ रोजी १९/३० वा. लेन नं.३,कोरेगांव पार्क,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील टेम्पोमध्ये जुना लोखंडी रॅक हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून घेवुन जात असताना,कोणतीही सुरक्षितता न बाळगतता टेम्पोचे मागील बाजुस ठेवुन व लोखंडी रॅकचे बाजुला मुलगा १.निलेश दिलीप सकपाळ २.रूपेश शंकर निरगुनकर यांना उभे करून सदरचा टेम्पो हा रदारीचे नियमांकडे दुर्लक्ष करून हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी टेम्पोचे मागील बाजुस लोखंडी रॅक हा झाडाचे फांदीस अडकुन दोघे रॅकसह खाली पडुन निलेश दिलीप सकपाळ यास जखमी करून,रूपेश शंकर निरगुनकर हा डोक्यावर पडुन गंभीर दुखापत होवुन त्याचे मृत्युस कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एन एम पवार ९८२२७९१६९९ |

## दि.३१/०८/१७ रोजी ००/०० वा. ते २४/०० वा. पर्यंतचा अटक आरोपी तक्ता

| अनं | पोलीस ठाणे | कलम | आरोपीचे नांव | वय |
|---|---|---|---|---|
| १ | कोंढवा | भादविक ४४७,३८७,५०४,५०६,३४ | महेश महादेव कोळी | ३४ |
| २ | कोंढवा | भादविक ४२०,४८१,४८२,३७९ | सलमान अहमद मारूफ | २२ |
| ३ | कोंढवा | भादविक ४२०,४८१,४८२,३७९ | अविनाश रविदत्त शर्मा | २५ |
| ४ | खडकी | भादविक ४२०,३४ | सचिन प्रभु डेढे | २७ |
| ५ | खडकी | भादविक ४१९,४२०,३४ | ओबेहेश फार्टुन | ४२ |
| ६ | खडकी | भादविक ४१९,४२०,३४ | बशीर दकीन घारी | २६ |
| ७ | खडकी | भादविक ४१९,४२०,३४ | इफेआनी मायके बोबेंझी | ३४ |
| ८ | वानवडी | भादविक ३२४,३५२,५०४,५०६ | सिकंदर पाशमियाँ शेख | २० |
| ९ | वानवडी | भादविक ३२४,३५२,५०४,५०६ | फरीद उमर कच्छी | २१ |
| १० | वानवडी | भादविक ३९२,३४ | अक्षय हरिहर शिरोळे | २१ |
| ११ | मुंढवा | भादविक ३०४(अ),२८५,२८६,३३७,३३८,४२७,३४ | योगेश सुधाकर सरोदे | ३८ |
| १२ | मुंढवा | भादविक ३०४(अ),२८५,२८६,३३७,३३८,४२७,३४ | माणिक सुखाराम बिष्णोई | ३३ |
| १३ | लष्कर | भादविक ३८० | शाहरूख रहीम मोमीन | २४ |
| १४ | लष्कर | भादविक ३८० | जब्बीर हुसेन खान | ३८ |
| १५ | निगडी | भादविक ४२०,४०६ | माधव सुभाष भंडगे | ३४ |
| १६ | निगडी | भादविक ४२०,४०६ | सचिन चंद्रकांत मु-हे | २८ |
| १७ | येरवडा | भादविक ४०६,४२०,५०६,३४ | कैलास ज्ञानदेव खरपडे | ३६ |
| १८ | हडपसर | भादविक ४६५,४६७,४६८,४७१,४२०,३४ | विकास प्रकाश झगडे | ३२ |
| १९ | हडपसर | भादविक ३०४(अ) | विजय तलभधारी चौहान | ४० |
| २० | चिंचवड | भादविक ४५७,३८० | अविनाश रोहिदास मोहिते | २७ |
| २१ | चिंचवड | भादविक ४५७,३८० | सुरेश गोरख जाधव | २७ |
| २२ | सांगवी | भादविक ३६३,३६६(अ),३७६ | सनी शंकर आवाडे | ३२ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**